जिल्हा परिषदेतील आदर्श ग्राम सेवक पुस्कार प्राप्त ग्राम सेवक/ग्राम विकास अधिकारी यांना एक आगाऊ वेतनवाढ मंजूर करणेबाबत..

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः जिपअ-२०२२/प्र.क्र.३६०/आस्था-४
बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई-४०० ००१.
दिनांक:- ०८ मे, २०२३

वाचा :-

१) महाराष्ट्र राज्य ग्राम सेवक युनियन ( डी.एन.ई. १३६ ) , यांचे पत्र क्रमांक दिनांक १७-११/२०२२
२) ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक वेप्रोब-१०९६/प्र.क्र.३२०२/४९ दिनांक १० नोव्हेंबर, १९९८
३) ग्राम विकास विभाग, शासन परिपत्रक मागणी २०१०/प्र.क्र. २८७/आस्था-९, दिनांक २६-१०-२०१०
४) ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रासेपु २०११/प्र.क्र.१०८/आस्था-९ दिनांक १९-४-२०१२
५) मा.उच्च न्यायलय, खंडपीठ औरंगाबाद मधील रिट याचिका क्रमांक ९६०२/२०२१ व इतर बाबत दिनांक २६-९-२०२२ रोजीचा अंतिम निकाल
६) विधी व न्याय विभाग परिपत्र क्रमांक ६८१/२०१६ /एमआयएससी/ई दिनांक २८/२/२०१७
७) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन पत्र क्रमांक न्यायप्र-२५१७/प्र.क्र. १७४/ आस्था-१०, दिनांक ०१-०८-२०१७

प्रस्तावना :-

जिल्हा परिषद अंतर्गत ग्रामीण भागात , त्या भागाचा विकास, नागरीकांच्या मुलभूत गरजा व शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीमध्ये ग्रामसेवक हा मुख्य घटक असतो. त्यांच्या कार्याचा गौरव व्हावा व त्यांना आपले कामकाज करण्यासाठी प्रोत्साहन मिळावे म्हणून सर्वोकृष्ट काम करणाऱ्या ग्राम सेवक / ग्राम विकास अधिकारी यांना आदर्श ग्राम सेवक म्हणून सन्मानित करण्याचा व एक आगाऊ वेतन वाढ देण्याचा निणर्य ग्राम विकास विभागाच्या शासन निर्णय दिनांक १० नोव्हेंबर, १९९८ अन्वये घेण्यात आला होता. सदर शासन निर्णयाची योग्य प्रकारे अंमलबजावणी व्हावी यास्तव ग्राम विकास विभाग शासन परिपत्रक दिनांक १९ एप्रिल, २०१० अन्वये सर्व जिल्हा परिषीदांना सूचना देण्यात आल्या आहेत. ग्राम विकास विभाग, शासन निर्णय दिनांक १९ एप्रिल, २०१२ अन्वये आदर्श ग्राम सेवक पुरस्कार निवडीसाठी समितीची पुर्नरचना करण्यात आली आहे.

२. उपरोक्त कोणतेही शासन निर्णय वा शासन परिपत्रक अद्याप अधिक्रमित करण्यात आलेले नसतानाही राज्यातील ३१ जिल्हा परिषदांमध्ये आदर्श ग्राम सेवक पुरस्कार प्राप्त ग्रामसेवक/ग्राम विकास अधिकारी यांना

Scanned with CamScanner

एक वेतनवाढ अद्याप देण्यात आलेली नाही आणि या प्रकरणी मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद यांनी रिट पिटीशन क्रमांक ११८४६/२०२१ मध्ये, त्यांच्या दिनांक २६-९-२०२२ रोजीची आदेशान्वये, या प्रकरणातील सर्व याचिका कर्त्यांचे म्हणणे मान्य करुन एक आगाऊ वेतनवाढ देण्याचे आदेश पारित केले आहेत.

३. एखादया प्रकरणी मा.न्यायालयाने दिलेल्या न्याय निर्णयाची अंमलबजावणी झाली नसल्यास, समान पातळीवरील कर्मचारी / अधिकारी यांना सदर न्याय निर्णय लागू करण्याबाबतचे अधिकार, विधी व न्याय विभागाने दिनांक २८/२/२०१७ च्या परिपत्रकान्वये संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागास दिले आहेत ( मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी मुळ अर्ज क्र. ५९,६१, व ९०/२०१६ मध्ये दिनांक १४-१२-२०१६ रोजी दिलेल्या आदेशानुसार सेवा विषयक बाबी संदर्भात न्यायालयाने दिलेले आदेश समान पातळीवर इतर कर्मचारी/ अधिकाऱ्यांना लागू होत असल्याबाबतचे तत्व अधोरेखित केले आहे. तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाने State oF UttAR Pradesh and Ors. VS. Arvind Kumar Srivastav, २०१५ (१) SCC ३४७ या प्रकरणात सेवा विषयक बाबींमध्ये मा. न्यायालयाने दिलेले निर्णय समान पातळीवरील इतर कर्मचाऱ्यांना लागू करण्यात यावेत, हे तत्व नमूद केले आहे.

उपरोक्त बाबी लक्षात घेता, राज्यातील जिल्हा परिषदांमध्ये आदर्श ग्राम सेवक पुरस्कार प्राप्त ग्रामसेवक/ग्राम विकास अधिकारी यांना २४ ऑगस्ट, २०१७ पर्यंतच्या आगाऊ वेतनवाढी देण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने पुढीलप्रमाणे शासन निर्णय प्रसृत करण्यात येत आहे.

<u>शासन निर्णय :-</u>

१. राज्यातील जिल्हा परिषदांमध्ये **आदर्श ग्राम सेवक पुरस्कार** प्राप्त ग्रामसेवक/ग्राम विकास अधिकारी यांना, त्यांना देय असलेल्या २४ ऑगस्ट, २०१७ पर्यंतच्या आगाऊ वेतनवाढी देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय पुर्वलक्षी प्रभावाने लागू राहील.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक ३९/२३ सेवा-३दिनांक ३०-०५-२३ अन्वये व सामान्य प्रशासन विभाग अनौपचारीक संदर्भ क्रमांक ५८/का.८ दिनांक ०२-०३-२३ अन्वये प्राप्त मान्यतेने व सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.



Scanned with CamScanner

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३०५०९१८३९१०७५२० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SURESH DEORAM AMBEKAR

Digitally signed by SURESH DEORAM AMBEKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=RURAL DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=296e3c880fd1b089cf7bc9aed875e1bd95a2e8ed913596c74f7aa9e24917bc3c, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2768FD72EB50BA92D164687191D6F9C7C412A486DDA9C76BBD82BD2EB7012517, cn=SURESH DEORAM AMBEKAR
Date: 2023.05.09 18:41:06 +05'30'

**( सु. दे. आंबेकर )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**

१. अप्पर मुख्य सचिव, वित्त विभाग/शालेय शिक्षण/ग्राम विकास विभाग
२. सर्व विभागीय आयुक्त,
३. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
४. सर्व मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद
५. सर्व शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद
६. सर्व कोषागार अधिकारी, जिल्हा परिषद
७. निवड नस्ती. (ग्रामविकास विभाग/आस्था-४).



Scanned with CamScanner